**कि.फौ.अर्ज :- १३२/२०१८**
**रिता-वि-रमेश**
**नि. २७**

**गैरअर्जदारासाठी साक्षीदार क. १**
**नि. २७ प्रमाणे शपथेवर पुढील सरतपास सुरू:-**
**गैरअर्जदारासाठी श्री. एस. के. मानकर वकील साहेब.**

१. मी साक्षीपुराव्यासाठी शपथपत्र दाखल केले आहे. शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे. तो मजकुर मला वाचुन व समजावुन सांगीतला. त्यावर माझा अंगठा आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. शपथपत्र **नि. २७** वर आहे.

**उलटतपास अर्जदारासाठी श्री. पी. टी. गजबे वकील साहेब.**

**विनंतीवरून तहकुब.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | समक्ष |
| स्वा/-<br>(सं. दि. वानखेडे)<br>न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,<br>पारशिवनी. | स्वा/-<br>(सं. दि. वानखेडे)<br>न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,<br>पारशिवनी. |

दिंनाक :-३१/०१/२०१९.

**उलटतपास अर्जदारासाठी श्री. पी. टी. गजबे वकील साहेब.**

०२. मी लग्नापुर्वी रिताला बघावयास गेलो होतो. त्यावेळी अर्जदार रिताच्या कुटुंबीयांना व नातेवाईकांना मी शेती करतो असे सांगीतले होते. त्यावेळी अर्जदार रिताच्या कुटुंबीयांना वर्षाची साठ हजार रूपये कमवितो असे सांगीतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आजही शेती करतो. मी आज रोजी लागली तर मजुरीचे काम गावामध्ये करतो. मला शेतीतील कामे करता येतात. तसेच मी गुरे सांभाळण्याचे काम करतो. आज रोजी मला दर महीना चार ते

DISTRICT COURT NAGPUR

पाच हजार रूपये मजुरीचे मिळतात. मी लोकांच्या गायी म्हशी चारवित असतो. मी पाच ते दहा म्हैस व दोन ते तीन गायी चारत असतो. मला गायी म्हशी चारण्याकरीता २००/- रूपये मजुरी मिळते. मला महीन्यातुन १५ दिवस काम लागते. हे म्हणणे खरे नाही की, मला महीन्याला चार ते पाच हजार रूपये मजुरी मिळत असतांना मी जाणुनबुजुन माझया लेखी उत्तरात व शपथपत्रामध्ये तसा उल्लेख केला नाही. तसा उल्लेख माझया लेखी उत्तरात व शपथपत्रात का करण्यात आल नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

०३. मला भरतकाम व शिवणकाम काय असते या बाबत माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही भरतकाम व शिवणकाम करते असे मी शपथपत्रामध्ये खोटे सांगीतले आहे. अर्जदाराला भरतकाम व शिवणकाम येते या बाबतचा कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला भरतकाम व शिवणकाम येत नाही म्हणुन तसा कागदोपत्री पुरावा मी दाखल केला नाही.

०४. लग्नामध्ये अर्जदाराच्या नातेवाईकाकडुन भेटवस्तु आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला तिच्या लग्नामध्ये तिच्या आई वडीलांनी सोन्याचे दागीने दिले होते. मी लग्नामध्ये अर्जदार रिताला कानातील सोन्याच्या बि-या, गळयातील मंगळसुत्र, सोन्याची लंबी गरसोडी, पायातील चांदीची चैन व जोडवे दिले होते. मी हे दागीने नागपुर येथुन विकत घेतले होते. त्या बाबतच्या पावत्या माझयाकडे आहेत. त्या पावत्या मी न्यायालयात दाखल केल्या नाहीत. त्या पावत्या मी न्यायालयात दाखल करू शकतो.

**<u>उलटतपास विनंतीवरून तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-
(सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,
पारशिवनी.
दिंनाक :-१४/०२/२०१९.

समक्ष

स्वा/-
(सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,
पारशिवनी.

DISTRICT COURT NAGPUR

DISTRICT COURT NAGPUR

**उलटतपास शपथेवर पुन्हा सुरू**

०५.	माझयाकडे सोने खरेदीच्या पावत्या मिळुन आल्या नाही म्हणुन त्या न्यायालयामध्ये दाखल करू शकत नाही. असे झाले नाही की, मी दागिने व त्या पावत्या कोणाकडे गहाण ठेवल्या. हे म्हणणे खरे नाही की, लग्नातील दागिने हे अर्जदार रिताच्या वडीलांनी खरेदी केले होती. म्हणुन माझयाकडे त्याबाबतच्या पावत्या नाहीत.

०६.	हे म्हणणे खरे नाही की, लग्नातील सर्व दागिने अर्जदार रिता ही तिच्यासोबत घेउन गेली असे मी खोटे सांगीतले आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्नामध्ये अंदन म्हणुन मिळालेल्या भेटवस्तु आजही माझयाकडे आहेत. त्या अंदनामध्ये टि.व्ही., दिवाण, कुलर, मोठी अलमारी, मिळाली होती. साक्षीदार सांगतो की, कुलर हा अर्जदार रिताने विकला.

०७.	मी माझया कमाईची रक्कम माझयाकडेच ठेवतो. अर्जदार ही माझयाकडे असताना मी तिला पैसे देत होतो. अर्जदार ही जेंव्हा जेंव्हा माझयाकडे पैसे मागत होती तेंव्हा तेंव्हा मी तिला पैसे देत होतो. अर्जदार ही माझयाकडे असताना घरातील सामानाबाबतचा खर्च ती करत होती. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार ही मी दिलेल्या पैसामधुन सामान खरेदी करत होती. हे म्हणणे खरे नाही की, रिताला मी दिलेले पैसे संपल्यानंतर ती पैसांची मागणी मला करीत असे.

०८.	मी माझा मयत मुलगा पियंशु यावर मेडीकल हॉस्पीटल, नागपुर याठिकाणी उपचारावर खर्च करीत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मेडीकल हॉस्पीटल नागपुर याठिकाणी उपचाराकरीता खर्च लागत नाही. साक्षीदार सांगतो की, बाहेरून औषधे खरेदी करावी लागाते. हे म्हणणे खरे नाही की, मेडीकल

हॉस्पीटल याठिकाणी उपचाराकरीता कोणताही खर्च लागत नाही.

०९. मी गिता नावाच्या बाईला ओळखतो. ती माझया घराच्यासमोरच राहाते. हे म्हणणे खरे नाही की, माझे गिताबाईकडे नेहमी जाणेयेणे होते. गिताबाई ही माझया घरी येत नव्हती. अर्जदार रिता ही किती महिन्यांनी गर्भवती राहीली हे मला माहिती नाही. मला पियंशु चा जन्म कधी झाला हे सांगता येत नाही.

१०. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार रिता ही दिड महिन्याची गर्भवती असताना ती, माझया पाठीमागे आली त्यावेळी मी रिताला गिताबाईच्या घरी दिसलो. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि गिताबाई एकमेकांना मिठी मारून पलंगावर बसल्याचे अर्जदार रिताने बघितले. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार रिता ही माझया मागोमाग का आली यामुळे मी रागाने रिताच्या पोठावर लाथ मारली.

११. हे म्हणणे खरे नाही की, माझे गिताबाईसोबत लग्नाच्या पुर्वीपासुनच संबंध होते. हे म्हणणे खरे नाही की, ही बाब माझया घरच्या सर्वांना माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार रिताने ही बाब माझया घरच्यांना सांगीतली त्यावेळी माझे घरचे अर्जदार रिताला रागावले व रितालाच शांत बसण्यास सांगीतले.

१२. हे म्हणणे खरे नाही की, मी कामावर गेल्यावर अर्जदार रिता ही गिताबाईकडे गेली आणि तिच्या संसारामध्ये का येती याबाबत विचारणा केली. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार रिताच्या या बोलण्याबाबत गिताबाईने मला सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, गिताबाईने मला अर्जदार रिता आल्याबाबतचे सांगीतल्यामुळे मी दारू पिउन येउन त्या रात्री अर्जदार रिताला

DISTRICT COURT NAGPUR

मारहाण केली आणि उशीने तोंड दाबुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

१३. हे म्हणणे खरे नाही की, गिताबाईच्या कारणावरून माझयामध्ये व अर्जदार रितामध्ये भांडण होत असे. इसरू केवट हे माझे काका आहेत. ते माझया गावातच राहातात. माझे काका माझया घरी येतात. ते माझे काका असल्यामुळे व मी त्यांचा पुतण्या असल्यामुळे भेटायला येतात. हे म्हणणे खरे नाही की, माझे व रिताचे भांडण झाले त्यावळी मी माझे काका इसरू केवट ला बोलावीत होतो. माझे व रिताचे कधीच भांडण होत नव्हते.

**पुढिल उलटतपास विनंतीवरून तहकुब**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-
(सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,
पारशिवनी.
दिंनाक :-०७.०३.२०१९

समक्ष

स्वा/-
(सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,
पारशिवनी.

DISTRICT COURT NAGPUR